आदिवासी महिलांच्या उपजीविकेची साधने व सद्यस्थिती : एक समाजशास्त्रीय अध्ययन विशेष संदर्भ : किनवट तालुका

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ,नांदेड.
सामाजिक शास्त्रे विद्याशाखांतर्गत समाजशास्त्र
विषयातील पीएच. डी. पदवी करीता सादर
केलेला संशोधन आराखडा

संशोधक
घोडवाडीकर आनंद धोंडीबा
सामाजिक शास्त्रे संकुल, स्वा.रा.ती.म. विद्यापीठ, नांदेड.
ghodwadikaranand42@gmail.com
Mob.9763906136,9422991043

मार्गदर्शक
प्राचार्य डॉ. डि.डि.घोडगे
लोकमान्य महाविद्यालय,सोनखेड.
Mob.9970933067

आदिवासी महिलांच्या उपजिविकेची साधने व सद्यस्थिती :एक समाजशास्त्रीय अध्ययन: विशेष संदर्भ किनवट तालुका

भारतात जवळपास सर्वच राज्य व केंद्रशासित प्रदेशात आदिवासी समाजाचे वास्तव्य आढळते.भारतात ४६१ आदिवासी जमातीची नावे भिन्न आहेत.प्रत्येक जमातीची भाषा,बोलीभाषा,चालीरिती,सणवार,वस्त्रप्रावरणे इ.बाबीदेखील वेगवेगळया आहेत. भारतीय आदिवासीमध्ये भौगोलिक,वांशिक,भाषा,आर्थिक आणी सांस्कृतिक बाबतीत भिन्नता असल्याचे दिसून येते.

नैसर्गिक पर्यावरणात राहणाऱ्या या लोकांना कोणी जंगलाचे राजे म्हणतात तर कोणी त्यांना धरतीचे लेकरे म्हणतात.याच लोकाचा उल्लेख आदिवासी किंवा आदिम समाज म्हणुन केला जातो.विचारवंत अभ्यासक,प्रशासक व सामाजिक कार्यकर्ते यांनी सुध्दा या समाजाला विविध नावे दिली आहेत. रिस्ले,लॅस्सी,एल्वीन,ग्रिगसन,शुबर्न,सेडविक मार्टीन,ए.व्ही.ठक्कर यांनी या लोकाना'अगदी प्राचीन'किंवा 'अगदी मुळचे रहिवाशी' म्हटले आहे.(नागगोंडे गुरुनाथ 'भारतीय आदिवासी' कॉन्टीनेन्टल प्रकाशन,पुणे,२००३)

भारतात काही आदिवासी जमाती अतिमागास असुन या जमाती कंदमुळे,फळे गोळा करुन आपला उदरनिर्वाह करतात तर काही जमाती पशुपालन,शेती,मासेमारी,मजुरी करताना आढळतात.काही जमाती बांबुपासुन साहित्य तयार करताना तर काही औद्योगिक क्षेत्रात अकुशल श्रमीक म्हणुन काम करताना आढळतात यावरुन आजही भारतात आदिवासी समाज आर्थिक दृष्टया मागासलेला असल्याचे दिसुन येते.

आपण ज्यांना आदिवासी म्हणतो ते नागरी संस्कृतीपासून दूर राहिलेले मूळचे महाराष्ट्र राज्यात आदिवासी लोक ज्या भागात राहतात त्या भागांचे भौगोलिकदृष्ट्या खालील तीन विभाग पडतात.

१) **सह्याद्री विभाग** :-सह्याद्री पर्वताच्या विभागात महादेव कोळी, वारली, कोकणा,ठाकूर,कातकरी,मल्हारकोळी या जमातीची वस्ती आढळते. महाराष्ट्रातील एकूण आदिवासी लोकसंख्येत हे प्रमाण ३८ टक्के आहे.

२) **सातपुडा विभाग** :- सातपुडा पर्वतांच्या रांगांमध्ये भिल्ल, कोकणा, गावित, दुबळा, कोरकू, धानका, तडवी, पावरा या जमाती राहतात. या विभागात धुळे, जळगाव, औरंगाबाद, अमरावती या जिल्ह्यांचा समावेश होतो.

३) **गोंडवन विभाग** :-विदर्भातील डोंगराळ आणि जंगलमय प्रदेशात विशेषतः चंद्रपूर, भंडारा, गडचिरोली, यवतमाळ, नागपूर या जिल्ह्यात गोंड, माडिया गोंड, कोरकू,कोलाम, परधान, आंध या जमाती राहतात. भिल्ल महादेव कोळी, गोंड, वारली, कोकणा, कातकरी,ठाकूर, गावित,मल्हारकोळी, कोलाम, कोरकू या प्रमुख अनुसूचीत जमातींची लोकसंख्यां महाराष्ट्रातील एकूण आदिवासी लोकसंख्येच्या ८० टक्के आहे.

एक लाखाहून अधिक लोकसंख्या असलेल्या जमातीत या जमातीचा समावेश होतो.(डॉ. गोविंद गारे''महाराष्ट्रातील (आदिवासी) जमाती'' कॉन्टिनेन्टल प्रकाशन पुणे २००० पृ. क्र. १२)

आदिवासी समाज कष्टाळु व प्रामाणिक व सरळ मार्गी असल्याने स्वतःच्या सुधारणेसाठी आक्रमक संघर्षात्मक स्वरुपाची भुमिका घेत नाही.स्वातंयाच्या ७० वर्षानंतर सुध्दा ह्या समाजाची घरे डोंगरादरम्यान दुर्गमभागात वाडया-पाडयात आहेत. दगड-मातीची,कुडाची कच्ची घरे आहेत. हयामुळे आदिवासी व हया जमातीच्या महिला यांचा विकास हवा तसा झालेला नाही.कोणत्याही समाजाची सामाजिक व आर्थिक स्थिती ती त्यांच्या आरोग्य, शिक्षण व राहणीमानावरुन पडताळुन पाहता येते.या तिन्ही बाबीचा विचार एकुणच आदिवासी महिलांच्या अनुषंगाने केला तर त्या आजही तिन्ही पातळयावर संघर्ष करताना आढळून येतात.

आदिवासीं समाजातील स्त्रियांच्या दर्जासंबंधी अभ्यासकामध्ये एकवाक्यता नाही. कारण प्रत्येक जमातीचे वास्तव्याचे स्थान वेगवेगळे आहे. त्यामुळे ढोबळ मानाने निष्कर्ष काढता येत नाही.प्रत्यक्ष निरीक्षण व पाहणी करता आदिवासी स्त्रियांचे स्थान पाहता,बहुतांश आदिवासीं स्त्रिया अशिक्षित आहेत. मात्र त्या निसर्गाच्या खाणाखुणा ओळखणा-या आहेत. निसर्गात झालेल्या बदलाशी झगडणाऱ्या आहेत.आदिवासी स्त्रीही सृष्टीमध्ये स्वच्छंद वृत्तीने रमणारी आहे.आदिवासी स्त्रीला प्रपंचाचा गाडा चालविण्यासाठी जीवाचे रान करुन ती आपल्या पतिबरोबर समाधानाने जीवन जगत असते. ऊन, वारा, पाऊस, थंडी यांना तोंड देत आयुष्य जगणारी आहे आणि फाटक्या संसाराला ठिगळ लावणारी आहे. किमान गरजांमध्ये ,आनंदी राहण्याऱ्या आपल्या परंपरा रीतिरिवाज सांभाळून संसार करणारी आपल्या इज्जतीला जीवाचे मोल देणारी आदिवासी स्त्री आहे. ती आत्मसन्मानी आणि स्वाभिमानी आहे. पैशाच्या पाठीमागे ती धावत नाही. कारण ऐहिक सुखाचा विचार तिच्या डोक्यात नसतो. आदिवासी स्त्रीला सामाजिक व धार्मिक जीवनात मानाचे स्थान आहे. .(डॉ. संगवे विलास 'आदिवासींचे सामाजिक जीवन' पॉप्युलर प्रकाशन मुंबई दुसरी आवृत्ती १९७८ पृ.क्र. ४६.)

कोणत्याही समाजाचे आर्थिक जिवन सुकर होण्यासाठी त्या समाजातील महिला कुंटूबासाठी पुरुषाना कितपत आर्थिक मदत करतात यावर त्या महिलांचा दर्जा बऱ्याच प्रमाणात अवलंबुन असतो.अदिवासी महिलांच्या कुंटूबाचा परंपरागत व्यवसाय शेती हा आहे. परंतु आदिवासी जमातीमध्ये अल्पभुधारक व कोरडवाहु शेतीचे प्रमाण आधिक असल्या कारणाने त्यांना शेतमजुरी व जंगलसंपत्ती वर आपल्या कुटूंबाचा उदरनिर्वाह करावा लागतो.आदिवासी महिला शेती हंगाम संपल्यानंतर जंगलातील सागवान,तेंदुपत्ता ,डिंक,लाख,मोहाची फुले,चारोळया संकलीत करणे तसेच शिकार करणे इ.बाबी साठी जंगलाचा आधार घेउन स्वतः चा व आपल्या कुंटूबाचा उदरनिर्वाह करावा लागतो.तर काही आदिवासी महिला कुंटूबासह कामाच्या शोधात स्थलातंरित होत असताना दिसुन येतात.

आदिवासी महिला ही सामाजिक व आर्थिक दृष्टया मागासलेली आहे.स्वातंत्र प्राप्तीनतंर भारताने कल्याणकारी राज्याची संकल्पना स्विकारली असली तरी आदिवासी महिला हया सामाजिक,राजकिय,शारीरिक,मानसिक दृष्टया समाजव्यवस्थेत दुर्लक्षीत व उपेक्षीत राहिलेल्या आहेत. आपला दर्जा व राहणीमान सुधारण्यासाठी आर्थिक घटकही महत्वाचा ठरत असतो व त्यावरच व्यक्तीच्या गरजा पुर्ण होत असतात.भारतात केंद्रापासून ते घटक राज्यापर्यंत आर्थिक विकासासाठी विविध धोरण व योजना असुन सुध्दा त्याची अमलबजावणी व्यवस्थीत होताना दिसुन येत नाही.

आदिवासी महिला नैसर्गिक व आर्थिक परिस्थीतीशी झगडताना दिसुन येत आहेत. वर्षातील आठ महिने अनियमीत रोजगार तर उन्हाळयामध्ये जंगलातील विविध वनसंपत्ती गोळा करुन त्यामधुन जो पैसा जमा होईल त्यामधुन आदिवासी महिला आपला व आपल्या कुंटूबाचा उदरनिर्वाह चालवतात. आदिवासी महिलांचे आर्थिक स्वावलंबन हे फार महत्वाचे आहे.महिलांच्या आर्थिक सक्षमीकरणासाठी उत्पादनाची साधने यावर नियंत्रण आणि स्वायतत्ता देणे गरजेचे आहे.

वर उल्लेख केल्याप्रमाणे प्रमाणे आदिवासी महिला व त्यांचे कुंटूब जंगल व डोंगराळ प्रदेशात राहतात.आदिवासी हे आर्थिक व शैक्षणिक दृष्टया मागासलेले आहेत.त्यांच्या उन्नतीच्या मार्गात अनेक अडचणी आहेत.त्यांच्या भागात वाहतुकीच्या सोयी,पिण्याचे पाणी,हवेशीर घरे,वैद्यकिय सुविधा इत्यादीचा अभाव आढळतो.त्यांच्या जमिनी सावकार - जमिनदाराने बळकावल्या आहेत.त्यामुळे अदिवासी महिलाचे खच्चीकरण होताना दिसुन येत आहे.त्यांचे मुख्य प्रश्न गरिबी,अज्ञान,अतिमागासलेपणा,आर्थिक पिळवणूक व शोषण हे आहेत.

किनवट तालुक्यातील गोंड,आंध,परधान,भिल्ल आणि कोलाम आदिवासी महिला व त्यांचे कुंटूब या परिसरातील जंगल भागात असलेल्या पाडयावर आणि खोप्या मधुन राहतात.प्रत्येकाचे वेगळे असे पाडे नाहीत त्यामुळे निरनिराळया जमातीचे वैशिष्टये घेउन एक वेगळीच आदिवासी संस्कृती या परिसरात आकाराला आलेली आढळते.किनवट तालुक्यातील आदिवासी महिलांची एंकदरीत सामाजिक-आर्थिक स्थिती व दर्जा देशातील तथा महाराष्ट्रातील अदिवासी महिलाच्या सारखीच आहे का? किंवा यापेक्षा वेगळी आहे हे पाहणे महत्वाचे ठरेल.

अध्ययन महत्व :

प्रस्तुत अध्ययनात आदिवासी महिलांच्या उपजिवीकेची साधने व सद्यस्थिती चे समाजशास्त्रीय दृष्टीकोनातुन अभ्यास करण्यात येणार आहे तसेच आदिवासी महिलाच्या निगडीत असणाऱ्या उपजिवीकेच्या साधनांचा व सामाजिक दर्जाचा ,आर्थिक स्थितीचा व तसेच या आदिवासी जमातीसाठी व जमातीतील महिलासांठी असलेल्या शासकिय योजनामुळे महिलाच्या राहणीमानात.सुधारणा झाली का?त्यांना शैक्षणिक सुविधांचा लाभ

मिळतो का? महिलांच्या उपजिवीकेच्या साधनात कोणती वाढ झाली का? हयामुळेच दुर्लक्षीत असलेल्या आदिवासी महिलाच्या सामाजिक व आर्थिक समस्याचा अभ्यास करुन त्या समस्या सोडविण्यासाठी उपाय योजना सुचविण्यात येतील त्यामुळेच सदरिल अभ्यासाला अनन्य साधारण महत्व आहे.

संशोधन आराखडा :

विविध सामाजिक शास्त्रात सामाजिक घटनाचा, वास्तव परिस्थीतीचा अभ्यास करावयाचा असेल तर त्याकरीता संशोधन आराखडयाचे कार्य अंत्यत महत्वाचे मानले जाते.म्हणुनच संशोधन विषयाची सुक्ष्म चिकीत्सा करण्यासाठी उपयोगात आणावयाचा संशोधन आराखडा पुढीलप्रमाणे स्पष्ट केलेला आहे.

संशोधनाची उद्दिष्टे :

१. आदिवासी महिलाच्या उपजिवीकेची साधने कोणती याचा अभ्यास करणे.

२. आदिवासी महिलांचा सामाजिक दर्जा जाणून घेणे.

३. आदिवासी महिलाच्या आर्थिक स्थितीचा अभ्यास करणे.

४. आदिवासी महिलाची सद्यस्थिती जाणून घेणे.

५. आदिवासी महिलाच्या विकासाकरिता राबविल्या जाणाऱ्या शासकीय योजनाचा आढावा घेणे.

अध्ययन क्षेत्र.:

भारतात एकुण लोकसंख्येच्या पैकी १०४,५४५,७१६ एवढी लोकसंख्या आदिवासीची असुन त्यापैकी ५,२५४,७१५ पुरुष व ५१,९८,५०१ महिला आहेत तर महाराष्ट्रातील लोकसंख्येच्या पैकी १०,५१०,२१३ एवढी लोकसंख्या आदिवासीची असुन त्यापैकी ५,३१५,०२५ पुरुष व ५,१९५,१८८ महिला आहेत व नांदेड तालुक्यातील एकुण लोकसंख्येच्या पैकी २८१,६९५ एवढी लोकसंख्या आदिवासीची असुन त्यापैकी १४३,८९२ पुरुष व १३७,८०३ महिला आहेत किनवट तालूका नांदेड जिल्हयाच्या इशान्येकडील भाग आहे, तालूक्याच्या पूर्व आणि दक्षिणेला तेलंगाणा, पश्चिमेला आणि

उत्तर दिशेला महाराष्ट्र राज्याचा यवतमाळ जिल्हा आहे. तालूक्याचा एकूण भौगोलिक प्रदेश २०१२ कि मी आहे. नांदेड जिल्हयामध्ये एकूण ८ आदिवासी जमाती आसून त्यापैकी किनवट,माहूर,हदगाव,हिमायतनगर,भोकर या तालूक्यात गोंड,परधान,कोलाम,आंध,,नायकडा,भिल्ल इत्यादी आदिवासी जमाती आढळतात. प्रस्तुत विषयाचा समाजशास्त्रीय दृष्टीकोनातून अभ्यास करण्यासाठी नमुना निवड म्हणुन किनवट तालूक्याची निवड करण्यात येईल . किनवट तालूक्यात १७८एवढी गावे आहेत. यापैकी प्रस्तुत अध्ययनासाठी ज्या गावामध्ये आदिवासी जमातीतिल महिलांची लोकसंख्या जास्त आहे अशा गावाची यादी तयार करण्यात येईल व यादी तयार केलेल्या गावामधुन लॉटरी पद्धतीने काही गावाची निवड करण्यात येईल व निवडलेल्या गावामधुन आदिवासी जमातीतिल सहेतुक नमुना निवड पध्दतीच्या आधारे उत्तरदात्याची निवड करण्यात येईल.

संशोधन पध्दती:

संशोधनासाठी दोन प्रकारे तथ्य संकलन करता येते. या संशोधना करिता प्राथमिक साधन म्हणुन मुलाखत अनुसुची,गटचर्चा,व्यष्टी अध्ययन,निरीक्षण इ.तंत्राचा व व्दितीय सामग्री म्हणुन आदिवासी महिलावर लिखीत साहित्य,अहवाल,संदर्भ ग्रंथ,मासीके,त्रैमासीक,प्रकाशीत,अप्रकाशीत शोध प्रबंध,इंटरनेट सेवा इ.माध्यमांचा वापर करण्यात येईल.

संदर्भ:

१. *नागगोंडे गुरुनाथ* 'भारतीय आदिवासी' कॉन्टीनेन्टल प्रकाशन,पुणे,२००३.

२. *गोविंद गारे* ''महाराष्ट्रातील (आदिवासी) जमाती'' कॉन्टिनेन्टल प्रकाशन पुणे २००० पृ. क्र.१२

३. *संगवे विलास* 'आदिवासींचे सामाजिक जीवन' पॉप्युलर प्रकाशन मुंबई दुसरी आवृत्ती १९७८ पृ.क्र. ४६.)

४. *आहूजा राम* 'भारतीय समाज' श्रीमती प्रेमरावत पब्लिकेशन,जयपुर २०००.

५. *काळदाते सुधा* 'भारतीय समाजरचना' साकेत प्रकाशन औरंगाबाद १९७६.

६. *आगलावे प्रदिप* 'आदिवासी समाजाचे समाजशास्त्र' साईनाथ प्रकाशन नागपूर २००४.

७. Census of India 2011.

८. *ठाकूर सुंदर सिंह* ' आदिवासींचे समाजशास्त्र निर्मल प्रकाशन नांदेड २००६.

९. *अवचट अनिल* 'कार्यरत' मॅजेस्टिक प्रकाशन मुंबई १९९७.

१०.मुंढे सुमन 'आदिवासी स्त्रि जिवन ' सुगावा प्रकाशन, पुणे,२००४

११.गारे गोविंद 'आदिवासींचे शिक्षण' साकेत प्रकाशन औरंगाबाद १९९७

मार्गदर्शक
प्राचार्य डॉ. डि.डि.घोडगे
लोकमान्य महाविद्यालय,सोनखेड.

संशोधक
घोडवाडीकर आनंद धोंडीबा
सामाजिक शास्त्रे संकुल,
स्वा.रा.ती.म. विद्यापीठ, नांदेड.